7·

190

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग

# कातकरी जमातीसाठी इंदिरा आवास / घरकुल योजनेंतर्गत किती कुटुंबांना लाभ मिळाला - मूल्यमापन अहवाल

TRTI
संशोधनेन कल्याणम्
MAHARASHTRA STATE, PUNE.

२००६-०७

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

# अ नु क्र म णि का



| अ.क्र. | तपशील | | पृष्ठे | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| १ | प्रस्तावना | | १ | - |
| २. | प्रकरण क्रमांक १ | इंदिरा आवास /घरकुल योजना | २ | ५ |
| ३ | प्रकरण क्रमांक २ | मूल्यमानाचा उद्देश | ६ | - |
| ४. | प्रकरण क्रमांक ३ | कार्यपध्दती | ७ | १० |
| ५. | प्रकरण क्रमांक ४ | क्षेत्रीय पाहणी | ११ | ३९ |
| ६. | प्रकरण क्रमांक ५ | सारांश | ४० | ४१ |
| ७. | प्रकरण क्रमांक ६ | अडचणी व शिफारशी | ४२ | ४४ |
| ८. | प्रकरण क्रमांक ७ | निष्कर्ष | ४५ | ४६ |
| | | परिशिष्ट | ४७ | ४८ |
| | | प्रपत्र | ४९ | ५२ |

# प्रस्तावना

दारिद्र्य निर्मुलनासाठी शासनामार्फत विविध वैयक्तिक लाभाच्या योजना वेगवेगळ्या विभागाकडून राबविण्यात येतात. त्यामध्ये ग्रामीण विकास विभागाकडून जिल्हास्तरावर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी **इंदिरा आवास घरकुल** ही योजना राबविली जाते. तर आदिवासी विकास विभागाकडून कातकरी या अतिमागास जमातीसाठी १०० टक्के अनुदानावर **कातकरीसाठी घरकुल योजना** ~~ही योजना~~ राबविली जाते. या दोन्ही योजनेचा कातकरी या अतिमागास जमातीतील किती कुटुंबांना फायदा झाला आहे, हे पाहण्यासाठी व मूल्यमापनासाठी या योजनेची निवड करण्यात आली.

सदर मूल्यमापन पाहणीचे क्षेत्रीय काम श्री.के.एस.चव्हाण, सांख्यिकी अधिकारी,श्री.पं.बा.कुदळे,संशोधन सहाय्यक, श्री.एस.आर.तरकसबंद, श्री.जी.सी.लोंढे, संशोधन सहाय्यक व श्री.आर.एस.पवार, अन्वषेक यांनी पूर्ण केले असून मूल्यमापन अहवाल लिहिण्याचे काम श्री.के.एस.चव्हाण, सांख्यिकी अधिकारी यांनी श्री.एस.डी.बिराजदार, उपसंचालक (एक्षेविका) यांचे मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. अहवाल संगणकीय टंकलेखनाचे (डी.टी.पी.) काम श्री.किरण कुर्डे, लघुटंकलेखक यांनी केले आहे. तसेच क्षेत्रीय पाहणीच्या वेळी या योजनेचे मूल्यमापन दृष्य स्वरुपात होण्याच्या दृष्टीकोनातून श्री.आर.व्ही.रघतवान, कॅमेरामन यांनी चित्रीकरण व छायाचित्रण केले आहे.

सदर मूल्यमापन अहवाल इंदिरा आवास घरकुल योजनेची आखणी व अंमलबजावणी करणारे अधिकारी/कर्मचारी तसेच आदिवासी विकास विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना उपयोगी पडेल, अशी अपेक्षा आहे.

ठिकाण- पुणे<br>
दिनांक- 30/6/07

30/6/07<br>
(डॉ.शरद किनकर)<br>
आयुक्त,<br>
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,<br>
महाराष्ट्र राज्य, पुणे १

# प्रकरण -१

## इंदिरा आवास घरकुल योजना

दारिद्रय रेषेखालील ग्रामीण भागातील बेघर लोकांना निवारा उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. योजनेअंतर्गत ६० टक्के घरकुले अनुसूचित जाती/जमातीसाठी राखीव असतात. तर ४० टक्के घरकुले ही इतर लाभार्थ्यांसाठी असतात. घरकुल बांधतेवेळी शौचालये बांधणे आवश्यक असून घरकुलामध्ये निर्धुर चुली बसविणे आवश्यक आहे.

(अ) <u>योजनेची विस्तीर्ण रुपरेषा</u>

(१) **उद्देश :-** इंदिरा आवास योजनेचा प्राथमिक उद्देश अनुसूचित जाती/जमाती, मुक्त वेठबिगार व दारिद्रय रेषेखालील गरीब लोकांना निवासी घरांचे बांधकाम करण्यासाठी आर्थिक मदत देणे हा आहे.

(२) **निधीचे स्वरुप :-** इंदिरा आवास ही केंद्रीय योजना असून या योजनेचा निधी हा केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून ७५:२५ या प्रमाणात उपलब्ध होतो. केंद्रशासित प्रदेशाचे बाबतीत सर्व निधी हा केंद्र शासनाकडून उपलब्ध होतो.

(३) **लाभार्थ्यांची निवड :-** इंदिरा आवास योजनेचा लाभार्थी हा ग्रामीण भागात राहणारा, दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीचा, वेठबिगार कामगार व अनुसूचित जाती/जमातीचा नाही, परंतू ग्रामीण भागात राहणारा दारिद्रय रेषेखालील लाभार्थी तसेच विधवा स्त्रिया व देशाच्या सीमांचे रक्षण करताना कामी आलेल्या जवानांच्या पत्नी तसेच माजी सैनिक जर इतर अटी पूर्ण करीत असतील तर त्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो.

(४) **निधीचे वाटप :-** संबंधित वर्षी इंदिरा आवास योजनेखाली उपलब्ध असलेल्या एकूण निधीचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात येते.

१. त्यावर्षी एकूण उपलब्ध असलेल्या निधीच्या ६० टक्के निधी हा अनुसूचित जाती/जमातीच्या दारिद्रय रेषेखालील लाभार्थींची निवासी घरे बांधण्यासाठी /घरदुरुस्तीसाठी वापरण्यात येतो.

२. जास्तीत जास्त ४० टक्के निधी हा दारिद्रय रेषेखालील असलेल्या ग्रामीण भागातील अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व्यतिरिक्त लोकांच्यासाठी खर्च करण्यात येतो.

३. वरील दोन्ही पैकी ३ टक्के निधी हा शारिरीकदृष्टया व मानसिकदृष्टया विकलांग लोकांचे घरकुलासाठी खर्च करण्यात येतो

एखाद्या जिल्हयामध्ये वर दिलेल्या एखादया वर्गवारीमधील लाभार्थी जर उपलब्ध होत नसतील तर तो निधी इतर वर्गवारीमधील लाभार्थ्यांसाठी वापरता येतो. तथापि, त्या वर्गवारीमधील लाभार्थी उपलब्ध नाहीत, असे जिल्हा परिषदेने/जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने घोषित करावे लागते.

(५) **योजनेची अंमलबजावणी :-** या योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषद/जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून करण्यात येते. तथापि घरकुलाचे बांधकाम हे लाभार्थ्यांनी स्वत: करावयाचे असते.

(ब) लाभार्थ्यांची निवड करणे

**(१) लाभार्थ्यांची निवड :-** केंद्र शासनाकडून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेस प्रतिवर्षी घरकुलाचे आर्थिक व भौतिक उदिष्टय देण्यात येते. त्या उदिष्टांचे आधारे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, तालुका पंचायत समित्यांना घरकुलांचे उदिष्टांचे वाटप करुन देण्यात येते. त्यानंतर तालुका पंचायत समित्याकडून गांवनिहाय उदिष्टय वाटप करण्याची कार्यवाही केली जाते. संबंधित गांवाची ग्रामसभा दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या यादीमधून दिलेल्या उदिष्टयानुसार लाभार्थीची निवड करतात. ग्रामसभेने निवड केलेली यादी ही अंतिम असते. त्याकरिता उच्चस्तरीय समितीची या यादीस मंजुरी घेण्याची आवश्यकता नसते. पंचायत समिती व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांना ही यादी उच्चस्तरीय समितीस केवळ अवलोकनार्थ पाठविणे अपेक्षित असते.

**(२) लाभार्थी निवडीसाठी प्राधान्यक्रम :-** लाभार्थी निवडीसाठीचा प्राधान्यक्रम खालीलप्रमाणे असतो.

१. वेठबिगारीतून मुक्त झालेले मजुर

२. (अ) अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीची कुटुंबे ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे/दुर्दैवाचे बळी ठरलेले आहेत.

(ब) अनुसूचित जाती जमातीमधील विधवा आणि लग्न न झालेल्या महिला (देवदासी)

(क) अनुसूचित जाती/जमातीची कुटुंबे जे पूर, महापूर, भूकंप, वादळ, यासारख्या नैसर्गिक आपत्ती तसेच मनुष्यनिर्मित दंगल, मारामारी, हिंसाचार, जाळपोळ यामध्ये बळी पडलेली कुटुंबे

(ड) इतर अनुसूचित जाती/जमातीची कुटुंबे

३. लष्करी जवानांच्या विधवा पत्नी किंवा देशाच्या सीमांचे रक्षण करताना कामी आलेल्या जवानाच्या पत्नी

४. अनुसूचित जाती/जमाती सोडून इतर दारिद्रय रेषेखालील कुटुंबे

५. शारिरीक व मानसिकदृष्टया अपंग लोक

६. भारतीय लष्करसेवेतील निवृत्त माजी सैनिक आणि जवान

७. विकास प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या भटक्या जमाती आणि अवर्गीकृत जमाती, शारिरीक व मानसिकदृष्टया विकलांग झालेली कुटुंबे

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या कुटुंबांची अनुक्रमांक ३ वरील वर्गवारी वगळून दारिद्रय रेषेखालील लाभार्थी म्हणून निवड करण्यात येते.

**(क) लाभार्थ्यांचा सहभाग :-**

घरकुलाच्या बांधकामामध्ये लाभधारकाचा सहभाग असणे आवश्यक आहे. लाभधारकाने स्वत: बांधकामाचे साहित्य, कुशल कामगार आणि कुटुंबांतील काम करणाऱ्या व्यक्तीचा सहभाग घ्यावा. घराचे बांधकाम कशा प्रकारे करावयाचे याचे सर्व स्वातंत्र्य लाभधारकास असते. लाभधारकाने बांधकाम साहित्य नियंत्रित दराने पुरवठा करण्याबाबत जिल्हा ग्रामीण किवास यंत्रणेस विनंती केल्यास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून मदत मिळू शकते. त्यामुळे बांधकाम खर्चात बचत होऊन बांधकामाची गुणवत्ताही टिकविली जाते. त्याचा परिणाम लाभधारकास घर अधिक स्वस्त व चांगल्या गुणवत्तेचे बांधल्याचे उत्तम समाधान लाभते.

**(ड) घरकुलाचे वाटप**

इंदिरा आवास घरकुलाची मंजूरी कुटुंबांतील महिलेच्या नांवे करण्यात येते. त्यामुळे आपोआपच घरकुलांची मालकी पती व पत्नी या दोघाचे नांवे हाते.

## (इ) इंदिरा आवास घरकुल बांधकामाचे मूल्य

(१) इंदिरा आवास घरकुल योजनेअंतर्गत नवीन घरकुल बांधकामाचा खर्च रु.३०,०००/- आहे. लाभधारकाचा स्वत:च्या हिस्सा व शासन अनुदान याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | बाब | शासन अनुदान रुपये | लाभार्थ्यांचा हिस्सा रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | नवीन घरकुल बांधकाम | २८,५००/- | १,५००/- | ३०,०००/- |

## २. शौचालयाचे बांधकाम व निर्धुर चुली :-

इंदिरा आवास घरकुल लाभार्थ्यांने शौचालये बांधणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे घरकुलामध्ये निर्धुर चुली बसविणे पण बंधनकारक आहे. लाभार्थ्याने शौचालये त्याचे जागेत घरकुलापासून बाजूला बांधले तरी चालते.

## ३. इंदिरा आवास घरकुलाची जागा :

इंदिरा आवास घरकुल हे निवासी घरकुल लाभार्थ्याचे त्याचे स्वत:चे जागेवर बांधणे आवश्यक आहे. जर स्वत:ची जागा नसेल तर ही घरकुले एकत्र बांधणे सोयीचे असते. कारण या घरकुलांना मूलभूत सुविधा उदा.अंतर्गत रस्ते, सांडपाण्याची सोय, विद्युत व्यवस्था, पिण्याचे पाणी इ.देणे सोयीचे होते. सुरक्षिततेच्या दृष्टीने इंदिरा आवास घरकुले गांवाच्या जवळ असावीत. ती गांवापासून फार दूर बांधण्यात येऊ नयेत.

## ४. लाभार्थ्याला अनुदानाचे हप्ते देणे :

इंदिरा आवास घरकुल हे लाभार्थ्याने स्वत: बांधावयाचे असल्यामुळे घरकुलाचे बांधकाम जसजसे होईल तसतसे हप्ते दिले जातात. घरकुलाची सर्व रक्कम एकदम लाभार्थ्यास दिली जात नाही. घरकुलाचे काम जसजसे होईल तसतसे हप्ते लाभार्थ्यास देणे बंधनकारक आहे. किती हप्त्यात रक्कम दिली जाते ते हप्ते राज्य शासनाने अथवा संबंधित जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने ठरवावयाचे असतात.

* * *

# प्रकरण -२

## मूल्यमापनाचे उद्देश

दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती/जमाती, बिगर मागासवर्गीय व मुक्त वेठबिगार बेघर कुटुंबांना या योजनेतून घरकुल बांधून देण्यात येते. आदिवासी जमातीमधील कातकरी जमातींना इंदिरा आवास योजनेचा कितपत फायदा झाला हे पाहण्यासाठी मूल्यमापनाचे काम हाती घेण्यात आलेले असून त्याचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

(१) शासनाने विहित केलेल्या नियमाप्रमाणे कातकरी आदिवासी जमातींना इंदिरा आवास योजनेअंतर्गत कितपत फायदा झाला याचा अभ्यास करणे.

(२) या योजनेअंतर्गत किती कातकरी आदिवासी जमातींना लाभ देण्यात आला आहे, त्याची पाहणी करणे.

(३) योजना अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणी कोणत्या ते पाहणे व त्याचा अभ्यास करणे

(४) वाटप करण्यात आलेल्या घरकुलाच्या स्थितीचा अभ्यास करणे.

* * *

# प्रकरण -३

## कार्यपध्दती

ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील गरीब व बेघर लोकांना निवारा उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा उद्देश आहे. अनुसूचित जमातीच्या एकूण ४५ जमातीपैकी **कातकरी** ही अतिमागास जमात असून ही जमात मासेमारी करुन व जंगलातील वाळलेले लाकूड गोळा करुन ते विकून त्यावर उपजिविका करीत असतात तर काही लोक वीटभट्टीवर मोलमजुरी करुन आपली उपजिविका करीत असतात. विटभट्टीवर मोलमजुरी करण्यासाठी हे लोक मोठया प्रमाणात स्थलांतर करीत असतात. या अति मागास जमातीच्या लोकांना राहण्यासाठी निवारा उपलब्ध व्हावा म्हणून महाराष्ट्र शासनाने इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर **कातकरीसाठी घरकुल योजना** ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला असून ही योजना आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येते.

या योजनेचे मूल्यमापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, मूल्यमापन पाहणी करण्यासाठी एक प्रश्नावली तयार करण्यात आली होती. या प्रश्नावलीमध्ये (अ) कुटुंबांविषयीची माहिती व (ब) घरकुलासंबंधीची माहिती घेण्यात आली होती.

**(अ) कुटुंबांविषयीची माहिती :-**

या माहितीमध्ये कुटुंब प्रमुखाचे नांव, गांव शिक्षण त्याचबरोबर त्याचे कुटुंबातील सर्व सदस्यांची माहिती घेण्यात आली होती. कुटुंब दारिद्रय रेषेखाली आहे काय ? त्याचे वार्षिक उत्पन्न, कुटुंब प्रमुखाचा मुख्य व दुय्यम व्यवसाय, धारण केलेली जिरायत व बागायत जमीन, त्याचबरोबर त्याचेकडील असलेले पशुधन इ.बाबींची माहिती घेण्यात आली आहे.

**(ब) घरकुलासंबंधी माहिती :-**

या माहितीमध्ये घरकुल मंजूर झाल्याचे वर्ष, घरकुल कोणाकडून मंजूर झाले. घरकुलाच्या जागेची मालकी कोणाची आहे. घरकुल स्वत: बाधले की शासकीय यंत्रणेकडून बांधून घेण्यात आले. अनुदानाची रक्कम किती हप्त्यात मिळाली. एकूण खोल्याची संख्या, घरकुलात न्हाणीघर व शौचालय आहे का ? विद्युत व्यवस्था आहे काय ? घरकुलाचे छत पत्र्याचे, कौलारु की स्लॅबचे आहे. घरकुलाची जमीन मातीची की कोबा केलेली आहे, की फरशी बसविलेली आहे. त्याचबरोबर घरकुलाचे ठिकाण गांवात आहे का ? गांवापासून दूर पाडयामध्ये आहे. घरकुलामध्ये करमणुकीचे साधन

आहे काय ? कुटुंब प्रमुखाकडे सायकल, मोटारसायकल इ.वाहतूकीची साधने आहेत काय ? इ.बाबतची माहिती घेण्यात आलेली आहे.

**क्षेत्रीय पाहणी :-**

या मूल्यमापन पाहणीचे क्षेत्रीय काम करण्यासाठी सांख्यिकी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली एक पथक तयार करण्यात आले होते. सदर पथकामध्ये तीन संशोधन सहाय्यक व एक अन्वेषक यांचा समावेश होता. सदर पथकाने पुणे, रायगड, ठाणे व नाशिक या चार जिल्हयामध्ये जाऊन क्षेत्रीय पाहणीचे काम केलेले आहे. त्याची माहिती खालील तक्त्यात देण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.३.१

जिल्हा प्रकल्प कार्यालय व तालुकावार गांवाची संख्या व लाभार्थी संख्या दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | जिल्हा | प्रकल्प कार्यालय | तालुका | गांवाची संख्या | लाभार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रकल्प कार्यालय | जि.ग्रा.वि.यंत्रणा | एकूण |
| १. | पुणे | घोडेगांव | मावळ | १ | ३५ | ० | ३५ |
| | | | खेड | ३ | २७ | १ | २८ |
| | | | आंबेगांव | ३ | ९ | ११ | २० |
| | | एकूण | ३ | ७ | ७१ | १२ | ८३ |
| २. | रायगड | पेण | पनवेल | २ | १० | ० | १० |
| | | | पेण | ३ | १७ | ० | १७ |
| | | | खालापूर | १ | ६ | ० | ६ |
| | | | कर्जत | २ | १५ | ० | १५ |
| | | एकूण | ४ | ८ | ४८ | ० | ४८ |
| ३. | ठाणे | शहापूर | शहापूर | ४ | २३ | ८ | ३१ |
| | | जव्हार | जव्हार | ४ | ११ | १ | १२ |
| | | | वाडा | २ | ० | ३ | ३ |
| | | डहाणू | डहाणू | १ | ० | २० | २० |
| | | एकूण | ४ | ११ | ३४ | ३२ | ६६ |
| ४. | नाशिक | नाशिक | त्र्यंबकेश्वर | ६ | ३० | १ | ३१ |
| | | | पेठ | १ | १५ | ० | १५ |
| | | एकूण | २ | ७ | ४५ | १ | ४६ |
| | एकंदर एकूण | | १३ | ३३ | १९८ | ४५ | २४३ |

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, क्षेत्रीय पाहणीचे काम चार जिल्हयामध्ये सहा प्रकल्पांतर्गत १३ तालुक्यामध्ये करण्यात आले असून, १३ तालुक्यातील ३३ गांवामधील २४३ लाभार्थीची पत्रके भरण्यात आलेली आहेत. २४३ लाभार्थ्यांपैकी १९८ लाभार्थी प्रकल्प कार्यालयाचे तर ४५ लाभार्थी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे आहेत.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, रायगड या कार्यालयाकडून प्रयत्न करुनही लाभार्थ्यांची यादी मिळालेली नाही. त्यामुळे रायगड जिल्हयाची जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेची माहिती "निरंक "आहे.

**क) घरकुलाचे उद्दिष्ट व झालेले साध्य याची विभागवार माहिती :-**

केंद्र शासनामार्फत दारिद्रय रेषेखालील कुटूंबासाठी "इंदिरा आवास घरकुल " ही योजना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येते. इंदिरा आवास घरकुल योजनेच्या धरतीवर आदिवासी विकास विभागामार्फत "अनुसूचित/आदिम जमातीसाठी घरकुल " ही योजना सन २००३-०४ पासून सुरु करण्यात आली आहे. ही योजना विशेष केंद्रीय अर्थ सहाय्यातून राबविण्यात येत असून आदिम जमातीपैकी (कातकरी/कोलाम व माडिया) अतिमागास जमात कातकरी जमातीसाठी घरकुल या योजनेची मूल्यमापनासाठी निवड करण्यात आली आहे.

योजना सुरु झाल्यापासून आदिम जमातीकरिता देण्यात आलेल्या घरकुलाचे उद्दिष्ट व साध्य याची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

## तक्ता क्र. ३.२

## अनुसूचित/आदिम जमातीसाठी घरकुल उद्दिष्ट व साध्य

| अ. क्र. | विभाग | आदिवासी विकास विभाग शा.निर्णय दि.२९/३/२००४ | | | आदिवासी विकास विभाग शा.निर्णय दि.१०/८/२००४ | | | आदिवासी विकास विभाग शा.निर्णय दि.३१/३/२००५ | | | आदिवासी विकास विभाग शा.निर्णय दि.९/६/२००५ | | | एकूण | | | भौतिक साध्याची % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक उद्दिष्ट | भौतिक साध्य | दिलेले अनुदान | भौतिक उद्दिष्ट | भौतिक साध्य | दिलेले अनुदान | भौतिक उद्दिष्ट | भौतिक साध्य | दिलेले अनुदान | भौतिक उद्दिष्ट | भौतिक साध्य | दिलेले अनुदान | भौतिक उद्दिष्ट | भौतिक साध्य | दिलेले अनुदान | |
| १. | नाशिक | ४१९ | ३४२ | १२५.६३ | ३४८ | २७९ | १०४.३९ | ५५४ | २७७ | १६५.९० | ८२ | ८२ | २४.६० | १४०३ | ९८० | ४२०.५२ | ७० |
| २. | ठाणे | ११३६ | ११३६ | ३४०.८० | ६९३ | ५७३ | २०७.९० | ४१४ | २९६ | १२४.४० | ८३० | ४१८ | २४९.०० | ३०७३ | २४२३ | ९२२.१० | ७९ |
| ३. | अमरावती | ९२८ | ९२८ | २७८.४० | ५६३ | ५६२ | १६८.८० | ५६३ | ३९४ | १६९.११ | ४८२ | ३३७ | १४४.६० | २५३६ | २२२१ | ७६०.९१ | ८८ |
| ४. | नागपूर | ६२० | ५९५ | १८६.०० | ४१७ | २३७ | १२४.९७ | ५३६ | ४३२ | १६०.९० | ० | ० | ० | १५७३ | १२६४ | ४७१.८७ | ८० |
| म.राज्य एकूण | | ३१०३ | ३००१ | ९३०.८३ | २०२१ | १६५१ | ६०६.०६ | २०६७ | १३९९ | ६२०.३१ | १३९४ | ८३७ | ४१८.२० | ८५८५ | ६८८८ | २५७५.४० | ८० |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की घरकुलाचे भौतिक उद्दिष्ट सर्वात जास्त २४२३ ठाणे विभागास, त्याखालोखाल २२२१अमरावती विभागास, १२६४ नागपूर विभागास तर सर्वात कमी ९८० नाशिक विभागास देण्यात आलेले आहे. तर घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट साध्याची टक्केवारी सर्वात जास्त ८८ % अमरावती, ८० % नागपूर, ७९ % ठाणे, व ७० % नाशिक विभागाची आहे.

अधिक माहितीसाठी प्रकल्पनिहाय घरकुलाचे दिलेले उद्दिष्ट व साध्याची माहिती परिशिष्ट क्रमांक एक मध्ये दिलेली आहे.

# प्रकरण -४
# क्षेत्रीय पाहणी

कातकरी जमातीसाठी इंदिरा आवास/घरकुल योजनेची मूल्यमापन पाहणी, पुणे, रायगड, ठाणे व नाशिक या चार जिल्हयामध्ये घेण्यात आली. त्यामध्ये पुणे जिल्हयातील घोडेगांव, रायगड जिल्हयामधील पेण, ठाणे जिल्हयातील शहापूर, जव्हार व डहाणू तर नाशिक जिल्हयातील नाशिक प्रकल्पामध्ये घेण्यात आली. वरील प्रकल्पांतर्गत अनुक्रमे मावळ, खेड, आंबेगांव, पनवेल, पेण, खालापूर, कर्जत, शहापूर, जव्हार, वाडा, डहाणू, त्र्यंबकेश्वर व पेठ या १३ तालुक्यामधील ३३ गांवामध्ये घेण्यात आली.

## ४.१ मूल्यमापन पाहणी पथक :-

या मूल्यमापन पाहणीसाठी या कार्यालयातील सांख्यिकी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली एक पथक स्थापन करण्यात आले होते. या पथकातील सदस्य खालीलप्रमाणे होते.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्याचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | श्री.के.एस.चव्हाण | सांख्यिकी अधिकारी |
| २. | श्री.पी.बी.कुदळे | संशोधन सहाय्यक |
| ३. | श्री.एस.आर.तरकसबंद | संशोधन सहाय्यक |
| ४. | श्री.जी.सी.लोंढे | संशोधन सहाय्यक |
| ५. | श्री.आर.एस.पवार | अन्वेषक |

## ४.२ लाभार्थ्यांचे तालुकानिहाय वर्गीकरण :-

पुणे, रायगड, ठाणे व नाशिक या चार जिल्हयामध्ये क्षेत्रीय पाहणी करण्यात आली असून एकूण २४३ कातकरी लाभार्थी कुटुंबांची पत्रके भरण्यात आली आहेत. त्याचे तालुकानिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

## तक्ता क्र.४.१

### प्रकल्प कार्यालय व तालुकावार गांवाची संख्या व ताभार्थी संख्या दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | जिल्हा | प्रकल्प कार्यालय | तालुका | लाभार्थी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | घोडेगांव | मावळ | ३५ | ४२ |
| | | | खेड | २८ | ३४ |
| | | | आंबेगांव | २० | २४ |
| | | एकूण | ३ | ८३ | ३४ |
| २. | रायगड | पेण | पनवेल | १० | २१ |
| | | | पेण | १७ | ३५ |
| | | | खालापूर | ६ | १३ |
| | | | कर्जत | १५ | ३१ |
| | | एकूण | ४ | ४८ | २० |
| ३. | ठाणे | शहापूर | शहापूर | ३१ | ४७ |
| | | जव्हार | जव्हार | १२ | १८ |
| | | | वाडा | ३ | ५ |
| | | डहाणू | डहाणू | २० | ३० |
| | | एकूण | ४ | ६६ | २७ |
| ४. | नाशिक | नाशिक | त्र्यंबकेश्वर | ३१ | ६७ |
| | | | पेठ | १५ | ३३ |
| | | एकूण | २ | ४६ | १९ |
| | | एकूण | १३ | २४३ | १०० |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, पुणे जिल्हयातील ८३ (३४%) रायगड जिल्हयातील ४८ (२०%) ठाणे जिल्हयातील ६६ (२७%) तर नाशिक जिल्हयातील ४६ (१९%) असे एकूण २४३ कातकरी लाभार्थींची पाहणी करण्यात आली आहे.

## ४.३ एकूण लाभार्थीचे लिंगानुसार वर्गीकरण :

एकूण २४३ लाभार्थीची पाहणी करण्यात आली आहे त्यांचे लिंगानुसार (स्त्री/पुरुष) वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

### तक्ता क्र. ४.२

### एकूण लाभार्थीचे लिंगानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | जिल्हा | लाभार्थी संख्या | लिंग | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १ | पुणे | ८३ | २८ | ५५ | ८३ |
| २. | रायगड | ४८ | २६ | २२ | ४८ |
| ३. | ठाणे | ६६ | २८ | ३८ | ६६ |
| ४. | नाशिक | ४६ | ४५ | १ | ४६ |
| एकूण | | २४३ | १२७ | ११६ | २४३ |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, एकूण २४३ लाभार्थ्यापैकी १२७ (५२%) पुरुष लाभधारक तर ११६ (४८%) स्त्री लाभधारक आहेत.

वरील २४३ लाभधारकामध्ये प्रकल्प कार्यालय , आदिवासी विकास विभाग यांचेमार्फत लाभ देण्यात आलेल्या १९८ (८१%) लाभधारकांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे, तर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत लाभ देण्यात आलेल्या ४५ (१९%) लाभधारकांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे.

प्रकल्प कार्यालय यांचेमार्फत लाभ देण्यात आलेल्या १९८ लाभधारकांची जिल्हा व तालुकानिहाय आकडेवारी खालील तक्त्यामध्ये देण्यात आलेली आहे.

## तक्ता क्र.४.३ (अ)

## प्रकल्प कार्यालयामार्फत लाभ देण्यात आलेल्या लाभधारकांचे लिंगानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | लिंग | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १ | पुणे | ७१ | २२ | ४९ | ७१ |
| २. | रायगड | ४८ | २६ | २२ | ४८ |
| ३. | ठाणे | ३४ | २२ | १२ | ३४ |
| ४. | नाशिक | ४५ | ४५ | ० | ४५ |
| एकूण | | १९८ | ११५ | ८३ | १९८ |

प्रकल्प कार्यालयामार्फत लाभ देण्यात आलेल्या एकूण १९८ लाभार्थ्यांपैकी ११५ (५८%) पुरुष लाभार्थी तर ८३ (४२%) स्त्री लाभार्थी आहेत. नाशिक जिल्हयामध्ये लाभ देण्यात आलेले सर्व ४५ लाभधारक हे पुरुष असून तेथे सर्वेक्षण करण्यात आलेल्यापैकी एकाही स्त्री लाभधारकास लाभ देण्यात आलेला नाही.

## तक्ता क्र.४.३ (ब)

## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे मार्फत लाभ देण्यात आलेल्या लाभधारकांचे लिंगानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | लिंग | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १ | पुणे | १२ | ६ | ६ | १२ |
| २. | रायगड | ० | ० | ० | ० |
| ३. | ठाणे | ३२ | ६ | २६ | ३२ |
| ४. | नाशिक | १ | ० | १ | १ |
| एकूण | | ४५ | १२ | ३३ | ४५ |

*<u>टीप-</u>* जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, रायगड यांचकडून कातकरी लाभधारकांची माहिती प्रयत्न करुनही न मिळाल्यामुळे रायगड जिल्हयामधील लाभधारकांची संख्या निरंक दाखविण्यात आलेली आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडील ४५ लाभधारकामध्ये १२ (२७%) पुरुष लाभधारक तर ३३ (७३%) स्त्री लाभधारक आहेत. नाशिक जिल्हयामध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचा एक लाभधारक असून तो स्त्री लाभधारक आहे.

## ४.४ इंदिरा आवास घरकुल बांधकामाची स्थिती :-

प्रकल्प कार्यालयामार्फत देण्यात आलेल्या घरकुलाच्या बांधकामाची स्थिती खालील तक्त्यामध्ये दिलेली आहे.

तक्ता क्र.४.४ (अ)

घराचे बांधकामाची स्थिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | बांधकाम पूर्ण | प्लॅस्टर बाकी | छत पडणे बाकी | जोत्यापर्यंत पूर्ण | काम सुरु नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | मावळ | ३५ | ० | ३५ | ० | ० | ० |
| | | खेड | २७ | १ | ० | ० | २१ | ५ |
| | | आंबेगांव | ९ | २ | ० | ० | २ | ५ |
| | | एकूण | ७१ | ३ | ३५ | ० | २३ | १० |
| | | टक्केवारी | १००% | ४% | ४९% | ० | ३२% | १४% |
| २. | रायगड | पनवेल | १० | ७ | ० | ० | १ | २ |
| | | पेण | १७ | १० | ० | १ | २ | ४ |
| | | खालापूर | ६ | ६ | ० | ० | ० | ० |
| | | कर्जत | १५ | १५ | ० | ० | ० | ० |
| | | ४ | ४८ | ३८ | ० | १ | ३ | ६ |
| | | टक्केवारी | १००% | ७९% | ० | २% | ६% | १३% |
| ३. | ठाणे | शहापूर | २३ | २३ | ० | ० | ० | ० |
| | | जव्हार | ११ | ११ | ० | ० | ० | ० |
| | | २ | ३४ | ३४ | ० | ० | ० | ० |
| | | टक्केवारी | १००% | १००% | | | | |
| ४. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | ३० | ३० | ० | ० | ० | ० |
| | | पेठ | १५ | १५ | ० | ० | ० | ० |
| | | २ | ४५ | ४५ | ० | ० | ० | ० |
| | | टक्केवारी | १००% | १००% | | | | |
| | एकंदर | एकूण | १९८ | १२० | ३५ | १ | २६ | १६ |
| | | टक्केवारी | १००% | ६१% | १८% | ० | १३% | ८% |



F:\BackUpComp10\D-Drive\REPORT-GAWAN VAN UPAJ-MARATHI\PREFACE & INDIRA AWAS.doc

प्रकल्प कार्यालयामार्फत एकूण १९८ घरकुलांचे वाटप करण्यात आलेले आहे. त्यापैकी ७१ घरकुले पुणे जिल्हयातील असून ७१ पैकी फक्त ३ (४%) घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून लाभार्थी घरकुलांमध्ये राहत आहेत. तर ६८ (९६%) घरकुलांचे बांधकाम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे ६८ लाभधारकांना घरकुलांचा लाभ देऊनही घरकुल देण्याचे उदिष्टय साध्य झाले नसल्याचे दिसून येते.

घरकुलाच्या बांधकामाची स्थिती पुणे जिल्हयामध्ये समाधानकारक नाही. याच्या कारणांचा शोध घेतला असता, असे निदर्शनास आले आहे की, पुणे जिल्हयातील कातकरी लोक हे कोकणातून (रायगड, ठाणे जिल्हयातून) पुणे जिल्हयामध्ये मोलमजुरी/रोजगारासाठी आलेले आहेत व पुणे जिल्हयामध्येच स्थायिक झालेले आहेत. त्यामुळे त्यांना पक्के घर बांधण्यासाठी स्वत:ची अशी जागा नाही आणि जागा विकत घेऊन घरकुल बांधण्याइतकी त्यांची आर्थिक परिस्थिती नाही. तसेच बऱ्याच गांवामध्ये जागा विकत घ्यायचे जरी ठरविले तर कोणी त्यांना जागा विकत देत नाही. त्यामुळे अशा कातकरी जमातीच्या आदिवासींना जमीन अथवा जागा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांना घरकुलाचे बांधकाम करता येत नाही व पर्यायाने घरकुल वाटप योजनेचा उद्देश सफल होत नाही.

या योजनेचा उद्देश सफल व्हावा म्हणून काही गांवातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व सामाजिक कार्यकर्त्यांनी अशा कातकरी लोकांचे घरकुल बांधण्यासाठी ग्रामपंचायतीच्या मालकीची जागा उदा.गायरान, गावठाणातील जागा उपलब्ध करुन दिलेलेली आहे. काही गांवामध्ये ग्रामपंचायतीची जागा उपलब्ध नाही, अशा गांवामध्ये (उदा.आव्हाट, ता.खेड) खाजगी मालकीची जागा या लोकांना बक्षिसपत्र करुन मिळवून दिली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे घरकुलाचे बांधकाम करण्यास उशीर झाला असल्याचे दिसून येते.

रायगड जिल्हयामध्ये ४८ घरकुलांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यापैकी ३८ घरकुले बांधून तयार झालेली आहेत व त्यामध्ये लोक राहत असल्याचे दिसून आले आहे. १० घरकुलाचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत आहे. त्याबाबतच्या कारणांचा शोध घेतला असता काही लोक मोलमजुरीसाठी बाहेरगांवी गेल्याने तर काही लोकांच्या वैयक्तिक अडचणीमुळे घरकुलांचे बांधकाम अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे.

रायगड जिल्हयामध्ये बऱ्याच गांवामध्ये घरकुलाला प्लॅस्टर केलेले नाही. तथापि, लोक घरकुलामध्ये राहत आहेत. याबाबत चौकशी केली असता, असे सांगण्यात आले की, घरकुलाकरिता अनुदानाची रक्कम कमी असल्यामुळे

अनुदानाच्या रक्कमेत घरकुल बांधून पूर्ण होत नाही. त्यासाठी जिल्हा परिषद स्तरावरुन अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत की- (१) घरकुलाचे विटकाम सिमेंट मध्ये केले तर त्यास प्लॅस्टर करण्याची गरज नाही. (२) जर विटकाम मातीमध्ये केले तर त्या घरास प्लॅस्टर करण्यात यावे, असे मौखिक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

ठाणे जिल्हयामध्ये एकूण ३४ घरकुलांचे सर्वेक्षण करण्यात आले असून, त्या सर्व घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे व लाभार्थी घरकुलामध्ये राहत आहेत.

नाशिक जिल्हयामध्ये एकूण ४५ घरकुलांची क्षेत्रीय पाहणी करण्यात आली आहे. ती सर्व घरकुले बांधून पूर्ण आहेत व लाभार्थी त्यामध्ये राहत आहेत. त्र्यंबकेश्वर तालुक्यामध्ये असे निदर्शनास आले की, लाभार्थ्यांस घरकुल बांधण्याबाबतचे पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आल्यामुळे लाभार्थ्यांनी त्यांचे परंपरेनुसार मोठमोठी घरकुले बांधलेली आहेत. त्यामुळे काही लाभार्थ्यांनी घराचे छप्पर भाताच्या काडापासून व झाडाच्या पानांनी तयार केले असल्याचे दिसून आलेले आहे. घरकुलांच्या भिंती मातीमध्ये बांधलेल्या आहेत. तर घरकुलांची जमीन शेणाने सारवलेली असल्याचे दिसून आले आहे.

जिल्हा ग्रामीण विकास संस्थेमार्फत मंजूर करण्यात आलेल्या इंदिरा आवास घरकुल योजनेच्या घरकुलांची स्थिती खालीलप्रमाणे-

**तक्ता क्र. ४.४ (ब)**

**घरकुलाचे बांधकामाबाबतची स्थिती**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | बांधकाम पूर्ण | प्लॅस्टर बाकी | छत पडणे बाकी | जोत्यापर्यंत पूर्ण | काम सुरु नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | खेड | १ | १ | ० | ० | ० | ० |
| | | आंबेगांव | ११ | ११ | ० | ० | ० | ० |
| | | एकूण | १२ | १२ | ० | ० | ० | ० |
| २. | रायगड | - | - | - | - | - | - | - |
| ३. | ठाणे | शहापूर | ८ | ८ | - | - | - | - |
| | | जव्हार | १ | १ | - | - | - | - |
| | | वाडा | ३ | २ | - | १ | - | - |
| | | डहाणू | २० | २० | - | - | - | - |
| | | एकूण | ३२ | ३१ | - | १ | - | - |
| ४. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | १ | १ | - | - | - | - |
| | | एकूण | १ | १ | - | - | - | - |
| | एकंदर | एकूण | ४५ | ४४ | - | १ | - | - |



F:\BackUpComp10\D-Drive\REPORT-GAWAN VAN UPAJ-MARATHI\PREFACE & INDIRA AWAS.doc

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत मंजूर करण्यात आलेला एकूण ४५ इंदिरा आवास घरकुल योजनेच्या घरकुलाची क्षेत्रीय पाहणी करण्यात आली आहे. ४५ घरकुलांपैकी ४४ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झालेले असून, लाभार्थी या घरकुलामध्ये राहत आहेत. फक्त एक घरकुल अपूर्ण असून ते वाडा तालुक्यातील पाली या गांवातील आहे. ते सन २००५-०६ या वर्षात मंजूर करण्यात आलेले आहे. क्षेत्रीय पाहणीच्या वेळी सदर घरकुलाचे छत घालणे बाकी असल्याचे दिसून आलेले आहे.

डहाणू तालुक्यातील कासा या गांची जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत वाटप करण्यात आलेल्या २० इंदिरा आवास घरकुलाची क्षेत्रीय पाहणी करण्यात आली. सदर घरकुले सन २००१-०२ या वर्षी मंजूर करण्यात आलेली आहेत. त्यापैकी काही घरकुलांची पडझड झालेली असून काही घरकुलांच्या भिंतींना भेगा पडलेल्या आहेत. त्यामुळे काही घरकुले ५ वर्षामध्येच राहण्यास अयोग्य झाल्याचे निदर्शनास आले आहे.

## ४.५ लाभार्थींच्या घरातील स्त्री पुरुष संख्या :-

या सर्वेक्षणांतर्गत एकूण २४३ लाभार्थ्यांचे क्षेत्रीय पाहणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी १९८ लाभार्थी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाने वाटप केलेले आहेत. त्या १९८ लाभार्थ्यांच्या कुटुंबांतील स्त्री व पुरुष, मुले व मुली यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र.४.५ (अ)
कुटूंबातील एकूण सदस्य संख्या

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | कुटुंबांतील एकूण सदस्य संख्या | | | पुरुष | स्त्री | एकूण | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्री | एकूण | | | | | | |
| १. | पुणे | मावळ | ३५ | ६९ | ९० | १५९ | ३९ | ४३ | ८२ | ३२ | ४५ | ७७ |
| | | खेड | २७ | ५८ | ५५ | ११३ | २३ | २८ | ५१ | ३५ | २७ | ६२ |
| | | आंबेगांव | ९ | २० | २१ | ४१ | ८ | ९ | १७ | १२ | १२ | २४ |
| | | एकूण | ७१ | १४७ | १६६ | ३१३ | ७० | ८० | १५० | ७९ | ८४ | १६३ |

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | कुटुंबातील एकूण सदस्य संख्या | | | पुरुष | स्त्री | एकूण | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | रायगड | पनवेल | १० | २१ | २७ | ४८ | १४ | १५ | २९ | ७ | १२ | १९ |
| | | पेण | १७ | ३१ | २२ | ५३ | २५ | १८ | ४३ | ६ | ४ | १० |
| | | खालापूर | ६ | ७ | १३ | २० | ३ | ९ | १२ | ४ | ४ | ८ |
| | | कर्जत | १५ | ३२ | ३५ | ६७ | १९ | २३ | ४२ | १३ | १२ | २५ |
| | | **एकूण** | **४८** | **९१** | **९७** | **१८८** | **६१** | **६५** | **१२६** | **३०** | **३२** | **६२** |
| ३. | ठाणे | शहापूर | २३ | ४५ | ४९ | ९४ | १८ | २७ | ४५ | २७ | २२ | ४९ |
| | | जव्हार | ११ | ३१ | २८ | ५९ | १३ | १५ | २८ | १८ | १३ | ३१ |
| | | **एकूण** | **३४** | **७६** | **७७** | **१५३** | **३१** | **४२** | **७३** | **४५** | **३५** | **८०** |
| ४. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | ३० | ८१ | ५९ | १४० | ३६ | ३८ | ७४ | ४५ | २१ | ६६ |
| | | पेठ | १५ | ४१ | ४६ | ८७ | २४ | २४ | ४८ | १८ | २१ | ३९ |
| | | **एकूण** | **४५** | **१२२** | **१०५** | **२२७** | **६०** | **६२** | **१२२** | **६३** | **४२** | **१०५** |
| | **एकंदर** | **एकूण** | **१९८** | **४३६** | **४४५** | **८८१** | **२२२** | **२४९** | **४७१** | **२१७** | **१९३** | **४१०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, पुणे जिल्हयामध्ये ७१ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यामध्ये एकूण १४७ पुरुष व १६६ स्त्रिया आहेत. यामध्ये पुरुष ७० व स्त्रिया ८० तर मुले ७९ व मुली ८४ आहेत.

तसेच रायगड जिल्हयामध्ये ४८ कुटुंबांचे सर्वेक्षण केलेले आहे. त्या कुटुंबांमध्ये एकूण पुरुष ९१ व स्त्रिया ९७ आहेत. तर पुरुष ६१ व ६५ स्त्रिया आहेत. मुले ३० तर मुली ३२ आहेत.

या दोन्ही जिल्हयामध्ये पुरुषापेक्षा स्त्रियांची संख्या जास्त असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे चार जिल्हयांचा एकत्रित विचार केला असता १९८ कुटुंबांमध्ये ४३६ पुरुष व ४४५ स्त्रिया म्हणजे पुरुषापेक्षा स्त्रियांची संख्या जास्त आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत वाटप करण्यात आलेल्या ४५ लाभार्थी कुटुंबातील एकूण सदस्य संख्या व पुरुष, स्त्रिया तसेच मुले व मुली यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र.४.५ (ब)

**कुटूंबातील एकूण सदस्य संख्या**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | कुटुंबांतील एकूण सदस्य संख्या | | | पुरुष/स्त्रिया | | | मुले /मुली | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | मुले | मुली | एकूण |
| १. | पुणे | खेड | १ | ४ | २ | ६ | १ | १ | २ | ३ | १ | ४ |
| | | आंबेगांव | ११ | २१ | २२ | ४३ | १३ | १६ | २९ | ८ | ६ | १४ |
| | | एकूण | १२ | २५ | २४ | ४९ | १४ | १७ | ३१ | ११ | ७ | १८ |
| २. | रायगड | | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | एकूण | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३. | ठाणे | शहापूर | ८ | ५ | ११ | १६ | ४ | ९ | १३ | १ | २ | ३ |
| | | जव्हार | १ | ३ | ४ | ७ | २ | २ | ४ | १ | २ | ३ |
| | | वाडा | ३ | ४ | ६ | १० | ४ | ५ | ९ | ० | १ | १ |
| | | डहाणू | २० | ४७ | ४३ | ९० | २४ | २५ | ४९ | २३ | १८ | ४१ |
| | | एकूण | ३२ | ५९ | ६४ | १२३ | ३४ | ४१ | ७५ | २५ | २३ | ४८ |
| ४. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | १ | ३ | ३ | ६ | २ | १ | ३ | १ | २ | ३ |
| | | एकूण | १ | ३ | ३ | ६ | २ | १ | ३ | १ | २ | ३ |
| | एकंदर | एकूण | ४५ | ८७ | ९१ | १७८ | ७८ | ८१ | १५९ | ७६ | ५३ | १२९ |

वरील तक्त्यावरुन ४५ कुटुंबांतील एकूण सदस्य संख्येचा विचार केला असता ४५ कुटुंबामध्ये ८७ पुरुष व ९१ स्त्रिया आहेत. तर प्रौढ पुरुष ७८ व स्त्रिया ८१ म्हणजे पुरुषापेक्षा स्त्रियांची संख्या जास्त असल्याचे दिसून येते.

### ४.६ लाभार्थी कुटुंबांतील साक्षर/निरक्षर संख्या

एकात्मिक आदिवासी विकास प्रकलपाचे १९८ लाभार्थींच्या कुटुंबांतील साक्षर/निरक्षर व शिक्षणानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र.४.६ (अ)

साक्षर, निरक्षर व शिक्षणानूसार वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | एकूण साक्षर | | | एकूण निरक्षर | | | शिक्षणानुसार वर्गीकरण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | १ ली ते ४ थी | ५ वी ते ७ वी | ८ ते १० वी | ११ ते १२ वी |
| १. | पुणे | मावळ | ३५ | ४७ | ४६ | ९३ | २४ | ४२ | ६६ | ५० | ३३ | १० | ० |
| | | खेड | २७ | २० | १९ | ३९ | ३९ | ३५ | ७४ | ३१ | ५ | ३ | ० |
| | | आंबेगांव | ९ | ५ | ५ | १० | १५ | १६ | ३१ | ७ | ३ | ० | ० |
| | | एकूण | ७१ | ७२ | ७० | १४२ | ७८ | ९३ | १७१ | ८८ | ४१ | १३ | ० |
| २. | रायगड | पनवेल | १० | ८ | ९ | १७ | १३ | १८ | ३१ | ११ | ६ | ० | ० |
| | | पेण | १७ | ७ | ० | ७ | २३ | २३ | ४६ | ३ | ० | ४ | ० |
| | | खालापूर | ६ | ० | १ | १ | ७ | १२ | १९ | १ | ० | ० | ० |
| | | कर्जत | १५ | ३ | ३ | ६ | २९ | ३२ | ६१ | ३ | २ | १ | ० |
| | | एकूण | ४८ | १८ | १३ | ३१ | ७२ | ८५ | १५७ | १८ | ८ | ५ | ० |
| ३. | ठाणे | शहापूर | २३ | ७ | ३ | १० | ३८ | ४६ | ८४ | ९ | १ | ० | ० |
| | | जव्हार | ११ | ७ | २ | ९ | २६ | २४ | ५० | ४ | १ | ३ | १ |
| | | एकूण | ३४ | १४ | ५ | १९ | ६४ | ७० | १३४ | १३ | २ | ३ | १ |
| ४. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | ३० | १९ | १३ | ३२ | ६२ | ४६ | १०८ | २२ | ८ | २ | ० |
| | | पेठ | १५ | १९ | १६ | ३५ | २० | ३२ | ५२ | १९ | ११ | ४ | १ |
| | | एकूण | ४५ | ३८ | २९ | ६७ | ८२ | ७८ | १६० | ४१ | १९ | ६ | १ |
| | | एकंदर एकूण | १९८ | १४२ | ११७ | २५९ | २९६ | ३२६ | ६२२ | १६० | ७० | २७ | २ |

एकूण १९८ कुटुंबांमध्ये साक्षर लोक २५९ असून त्यामध्ये १४२ (५५%) पुरुष व ११७ (४५%) स्त्रिया साक्षर आहेत. तर ६२२ निरक्षर लोकांपैकी २९६ (४८%) पुरुष

व ३२६ (५२%) स्त्रिया आहेत. १ ली ते ४ थी पर्यंत शिकलेले १६० व्यक्ती असून ११ वी १२ वी पर्यंत शिकलेले फक्त दोनच लोक आहेत व ते जव्हार व पेठ तालुक्यातील प्रत्येकी एक एक आहेत.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या ४५ लाभार्थींचा साक्षर व निरक्षर व शिक्षणानुसार वर्गीकरणाची स्थिती खालील तक्त्यामध्ये दिलेली आहेत.

तक्ता क्र.४.६ (ब)

साक्षर, निरक्षर व शिक्षणानूसार वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | एकूण साक्षर | | | एकूण निरक्षर | | | शिक्षणानुसार वर्गीकरण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | १ ली ते ४ थी | ५ वी ते ७ वी | ८ वी ते १० वी | ११ वी ते १२ वी |
| १. | पुणे | खेड | १ | ३ | १ | ४ | १ | १ | २ | ३ | १ | ० | ० |
| | | आंबेगांव | ११ | ६ | ६ | १२ | १५ | १६ | ३१ | ५ | ६ | १ | ० |
| | | एकूण | १२ | ९ | ७ | १६ | १६ | १७ | ३३ | ८ | ७ | १ | ० |
| २. | रायगड | | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | एकूण | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३. | ठाणे | शहापूर | ८ | १ | १ | २ | ४ | १० | १४ | ० | २ | ० | ० |
| | | जव्हार | १ | ३ | ० | ३ | ० | ४ | ४ | २ | ० | १ | ० |
| | | वाडा | ३ | १ | ० | १ | ३ | ६ | ९ | ० | १ | ० | ० |
| | | डहाणू | २० | ३ | ३ | ६ | ४३ | ४१ | ८४ | ३ | ३ | ० | ० |
| | | एकूण | ३२ | ८ | ४ | १२ | ५० | ६१ | १११ | ५ | ६ | १ | ० |
| ४. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | १ | ० | १ | १ | ३ | २ | ५ | १ | ० | ० | ० |
| | | एकूण | १ | ० | १ | १ | ३ | २ | ५ | १ | ० | ० | ० |
| | | एकंदर एकूण | ४५ | १७ | १२ | २९ | ६९ | ८० | १४९ | १४ | १३ | २ | ० |

एकूण ४५ कुटुंबांमध्ये २९ साक्षर व्यक्ती असून त्यापैकी १७ (५९%) पुरुष व १२ (४१%) स्त्रिया साक्षर आहेत. तर निरक्षर १४९ लोक असून त्यापैकी ६९ (४६%) पुरुष व ८० (५४%) स्त्रिया निरक्षर असल्याचे दिसून येते. तर साक्षर लोकांपैकी १ ली

ते ४ थी पर्यंत शिकलेले १४, ५वी ते ७ वी पर्यंत शिकलेले १३ व ८ वी ते १० वी पर्यंत शिकलेल्या फक्त २ व्यक्ती आहेत.

## ४.७ लाभार्थी कुटुंबांचे व्यवसायानुसार वर्गीकरण :-

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाकडून लाभ देण्यात आलेल्या १९८ लाभार्थींचे मुख्य व गौण व्यवसायानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र.४.७ (अ)

कुटूंबाचे व्यवसायानुसार वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | मुख्य व्यवसाय | | | | | | | दुय्यम व्यवसाय | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शेती | शेतमजुरी | मंजुरी | नोकरी | मासेमारी | लाकुडफाटा गोळा करणे | व्यवसाय | शेती | शेतमजुरी | मंजुरी | नोकरी | मासेमारी | लाकुडफाटा गोळा करणे | व्यवसाय |
| १. | पुणे | मावळ | ३५ | - | - | ३१ | ४ | - | - | - | - | ३२ | - | - | १ | - | - |
| | | खेड | २७ | - | - | २७ | - | - | - | - | - | १६ | - | - | १० | - | १ |
| | | आंबेगांव | ९ | - | - | ९ | - | - | - | - | - | ४ | - | - | ५ | - | - |
| | | एकूण | ७१ | - | - | ६७ | ४ | - | - | - | - | ५२ | - | - | १६ | - | १ |
| २. | रायगड | पनवेल | १० | - | - | १० | - | - | - | - | - | ५ | - | - | - | ५ | - |
| | | पेण | १७ | - | - | १७ | - | - | - | - | - | १४ | - | - | - | ३ | - |
| | | खालापूर | ६ | - | - | ६ | - | - | - | - | - | ६ | - | - | - | - | - |
| | | कर्जत | १५ | - | - | १५ | - | - | - | - | - | १० | - | - | - | ५ | - |
| | | एकूण | ४८ | - | - | ४८ | - | - | - | - | - | ३५ | - | - | - | १३ | - |
| ३. | ठाणे | शहापूर | २३ | - | ६ | १६ | - | - | - | १ | - | ९ | ५ | - | १ | ७ | १ |
| | | जव्हार | ११ | - | ५ | ६ | - | - | - | - | - | ६ | ५ | - | - | - | - |
| | | एकूण | ३४ | - | ११ | २२ | - | - | - | १ | - | १५ | १० | - | १ | ७ | १ |
| ४. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | ३० | २ | ८ | १९ | - | - | - | १ | - | १९ | ११ | - | - | - | - |
| | | पेठ | १५ | - | १४ | १ | - | - | - | - | - | १ | १४ | - | - | - | - |
| | | एकूण | ४५ | २ | २२ | २० | - | - | - | १ | - | २० | २५ | - | - | - | - |
| | एकंदर | एकूण | १९८ | २ | ३३ | १५७ | ४ | - | - | २ | - | १२२ | ३५ | - | १७ | २० | २ |
| | | टक्केवारी | १०० | १ | १७ | ७९ | २ | - | - | १ | - | ६२ | १८ | - | ९ | १० | १ |

एकूण १९८ लाभधारकापैकी सर्वात जास्त १५७ (७९%) लाभधारकांचा मजुरी हा मुख्य व्यवसायाय आहे. प्रत्येकी २ (१%) लाभधारकांचा शेती व व्यवसाय हा मुख्य व्यवसाय आहे तर दुय्यम व्यवसायामध्ये सर्वात जास्त १२२ (६२%) लाभधारकांचा शेतमजुरी हा दुय्यम व्यवसाय आहे. तर सर्वात कमी म्हणजे २ (१%) लाभधारकांचा व्यवसाय हा दुय्यम व्यवसाय आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून लाभ देण्यात आलेल्या ४५ लाभार्थीची मुख्य व दुय्यम व्यवसाय याची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

### तक्ता क्र.४.७ (ब)

### कुटूंबाचे व्यवसायानुसार वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | मुख्य व्यवसाय | | | | | | | दुय्यम व्यवसाय | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शेती | शेतमजुरी | मंजुरी | नोकरी | मासेमारी | लाकूडफाटा गोळा करणे | व्यवसाय | शेती | शेतमजुरी | मंजुरी | नोकरी | मासेमारी | लाकूडफाटा गोळा करणे | व्यवसाय |
| १. | पुणे | खेड | १ | - | - | - | - | १ | - | - | - | - | १ | - | - | - | - |
| | | खेड | ११ | - | १ | ९ | १ | - | - | - | - | ९ | १ | - | - | - | - |
| | | एकूण | १२ | - | १ | ९ | १ | १ | - | - | - | ९ | २ | - | - | - | - |
| २. | रायगड | पनवेल | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | एकूण | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३. | ठाणे | शहापूर | ८ | - | - | ८ | - | - | - | - | - | ८ | - | - | - | - | - |
| | | जव्हार | १ | - | - | १ | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | - |
| | | वाडा | ३ | - | १ | २ | - | - | - | - | - | २ | १ | - | - | - | - |
| | | डहाणू | २० | - | १ | १९ | - | - | - | - | - | १९ | १ | - | - | - | - |
| | | एकूण | ३२ | - | २ | ३० | - | - | - | - | - | ३० | २ | - | - | - | - |
| ४. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | १ | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | - |
| | | एकूण | १ | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | - |
| | | एकंदर एकूण | ४५ | - | ४ | ३९ | १ | १ | - | - | - | ३९ | ५ | - | - | - | - |
| | | टक्केवारी | १०० | - | ९ | ८७ | २ | २ | - | - | - | ८७ | ११ | - | - | - | - |

एकूण ४५ लाभार्थ्यापैकी ३९ (८७%) लाभार्थी मजुरी करतात. ४ (९%) लाभार्थी शेतमजुरी करतात. तर प्रत्येकी १ (२%) लाभार्थी अनुक्रमे नोकरी व मासेमारी करतात. दुय्यम व्यवसायांचा विचार करता ३९ (८७%) लाभार्थी शेतमजुरी करतात तर ५ (११%) लाभार्थी मजुरी करीत असल्याचे दिसून आले आहे.

## ४.८ लाभार्थी कुटुंबांचे उत्पन्नानुसार वर्गीकरण :-

प्रकल्प कार्यालयामार्फत घरकुलाचे वाटप करण्यात आले आहे. त्या लाभार्थीचे उत्पन्नानुसार वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र.४.८ (अ)

लाभार्थ्यांचे उत्पन्नानुसार वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | उत्पन्न रुपये | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ० ते १०००० | १०००१ ते १५००० | १५००१ ते २०००० | २०००१ ते २५००० | २५००१ ते ३०००० | ३०००० व पुढे |
| १. | पुणे | मावळ | ३५ | - | १ | ४ | ७ | ७ | १६ |
| | | खेड | २७ | १ | ५ | ८ | ६ | ४ | ३ |
| | | आंबेगांव | ९ | १ | ६ | १ | - | - | १ |
| | | एकूण | ७१ | २ | १२ | १३ | १३ | ११ | २० |
| २. | रायगड | पनवेल | १० | १ | ७ | २ | - | - | - |
| | | पेण | १७ | ७ | २ | ८ | - | - | - |
| | | खालापूर | ६ | ४ | २ | - | - | - | - |
| | | कर्जत | १५ | २ | ४ | ७ | १ | - | १ |
| | | एकूण | ४८ | १४ | १५ | १७ | १ | - | १ |
| ३. | ठाणे | शहापूर | २३ | १५ | ३ | ५ | - | - | - |
| | | जव्हार | ११ | १ | ६ | ४ | - | - | - |
| | | एकूण | ३४ | १६ | ९ | ९ | - | - | - |
| ४. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | ३० | १२ | १३ | ४ | १ | - | - |
| | | पेठ | १५ | ४ | ९ | २ | - | - | - |
| | | एकूण | ४५ | १६ | २२ | ६ | १ | - | - |
| | | एकंदर एकूण | १९८ | ४८ | ५८ | ४५ | १५ | ११ | २१ |
| | | टक्केवारी | १०० | २४ | २९ | २३ | ८ | ६ | १० |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, दहा ते पंधरा हजार उत्पन्न असणारे सर्वात जास्त म्हणजे ५८ (२९%) लाभार्थी असून त्याखालोखाल दहा हजारापर्यंत उत्पन्न असणारे ४८ (२४%) लाभार्थी आहेत. तर पंचवीस ते तीस हजारापर्यंत उत्पन्न असणारे सर्वात कमी म्हणजे ११ (६%) लाभार्थी आहेत.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत इंदिरा आवास घरकुल योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. अशा लाभार्थ्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

### तक्ता क्र.४.८ (ब)

### लाभार्थ्यांचे उत्पन्नानुसार वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | एकूण उत्पन्न रुपये | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ० ते १०००० | १०००१ ते १५००० | १५००१ ते २०००० | २०००१ ते २५००० | २५००१ ते ३०००० | ३०००० च पुढे |
| १. | पुणे | खेड | १ | १ | - | - | - | - | - |
| | | आंबेगांव | ११ | - | ६ | १ | १ | - | ३ |
| | | एकूण | १२ | १ | ६ | १ | १ | - | ३ |
| २. | रायगड | पनवेल | - | - | - | - | - | - | - |
| | | **एकूण** | - | - | - | - | - | - | - |
| ३. | ठाणे | शहापूर | ८ | ४ | ४ | - | - | - | - |
| | | जव्हार | १ | - | - | १ | - | - | - |
| | | वाडा | ३ | १ | - | २ | - | - | - |
| | | डहाणू | २० | ७ | ९ | ४ | - | - | - |
| | | एकूण | ३२ | १२ | १३ | ७ | - | - | - |
| ४. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | १ | १ | - | - | - | - | - |
| | | **एकूण** | १ | १ | - | - | - | - | - |
| | एकंदर | एकूण | ४५ | १४ | १९ | ८ | १ | - | ३ |
| | | टक्केवारी | १०० | ३१ | ४२ | १८ | २ | - | ७ |

एकूण ४५ लाभार्थीपैकी १९ (४२%) लाभार्थी दहा ते पंधरा हजार उत्पन्न असणारे आहेत. त्याखालोखाल १४ (३१%) लाभार्थी दहा हजारापर्यंत उत्पन्न असणारे आहेत. तर सर्वात कमी म्हणजे १ (२%) लाभार्थी तीस ते पंचवीस हजार रुाये उत्पन्न असणारा आहे.

## ४.९ लाभधारकांनी धारण केलेली जमीन :-

प्रकल्प कार्यालयामार्फत घरकुले वाटप करण्यात आलेल्या १९८ लाभधारकाचे जमीनधारणेनुसार वर्गीकरण धारण केलेली जमीन खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र.४.९ (अ)

लाभधारकांचे जमिन धारणेनुसार वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | धारण केलेली जमीन | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मालकीची | | खंडाची | | जंगल खात्याची | | इतर | | एकूण | |
| | | | | एकर | आर | एकर | आर | एकर | आर | एकर | आर | एकर | आर |
| १. | पुणे | मावळ | ३५ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | खेड | २७ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | आंबेगांव | ९ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | एकूण | ७१ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २. | रायगड | पनवेल | १० (२) | २ | - | - | - | - | - | - | - | २ | - |
| | | पेण | १७ (३) | ३ | १० | - | - | - | - | - | - | ३ | १० |
| | | खालापूर | ६ | ६ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | कर्जत | १५ (२) | - | २० | - | - | १ | २० | - | - | २ | - |
| | | **एकूण** | **४८ (७)** | **५** | **३०** | **-** | **-** | **१** | **२०** | **-** | **-** | **७** | **१०** |
| ३. | ठाणे | शहापूर | २३ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
